# (योगा)योगी प्राणी

आशिष महाबळ

LAMAL 29 August 2010

अनेक वर्षांपासुन पहायच्या असलेल्या तीन राष्ट्रीय उद्यानांना - लासन, रेडवुड्स व क्रेटर लेक - १४ ते २१ ऑगस्ट २०१० दरम्यान आम्ही भेट  दली. प्रत्येक उद्यानाचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. रेडवुड्स मध्ये उंचीत परीकथांमधील झाडांना लाजवतील इतक्या उंचीची ती झाडे, त्यात पुन्हा समुद्रकिनार्याजवळ आणी न  दसलेला सुय या मुळे आमचे दोन  दवसांचे वास्तव्य सुखावह झाले. लासन आ  क्रेटर लेक दोन्ही ज्वालामुखींची स्थाने. क्रेटर लेक कोसळलेला ज्वालामुखी, तर लासन अजुनही धुमसत असलेला. तेथील वास्तव्य देखिल चांगले झाले.

इतर अनेक गोष्टी सांगता येतील, पण इथे मी केवळ  तथे दसलेल्या प्राण्यांबद्दल, त्यासंबंधीच्या एकदोन योगायोगांबद्दल  लहीणार आहे.





लासन मध्ये  दवस नंबर दोनला आम्ही रस्ता न सापडण्यासारखे तसे नेहमीचे प्रकार करुन व एक नयनमनोहर धबधबा पदरात पाडुन घेउन संध्याकाळी जरा उशीराच मुख्य रस्त्यापर्यंत पौचलो. अचानक अनु म्हणाली, 'अरे ते अस्वल बघा', आ   खरेच आम्ही जेथुन १०-१५  मनीटांपुर्वी  आलो होतो त्याजवळच एक भुरे अस्वल चरत होते. (ती आधी गाय म्हणाली, पण मी ते इथे सांगणार नाही). मन भरुन त्याचे दर्शन घेऊन आम्ही नघणार इतक्यात रस्त्याकडे बोट दाखवून अनु म्हणाली, 'ते हरीण बघा'. आ   रस्ता ओलांडुन एक हरीण गेले. रेडवुड्स व क्रेटर लेकला देखिल हरणे  दसली.






लासनमध्ये व नंतरही अनेक खारी  दसल्या. त्या खारी की चपमंक्स याबद्दल आधी आमची खात्री नव्हती, पण नंतर त्या Golden-mantled Ground Squirrels असल्याचे कळले. दुसर्याही एका प्रकारची खार  दसली. हे छोटे प्राणी तसेच  धटुकले असतात. त्यात अशा  ठकाणी ते लोकांमुळे जास्तच जाणवते. मी तसा असे मानणारा आहे की नीयम हे तोडण्याकरीताच असतात (नाहीतर ती नैसर्गीक बंधने असती, जसे 'प्रकाशाच्या गतीपेक्षा वेगाने गाडी हाकु नये'). काही बंधने मात्र नेहमी पाळल्या जावी असे वाटते, जसे अनुज्ञा नसेल तेथे पाळीव प्राण्यांना न नेणे. त्याचप्रकारे जंगलातील श्वापदांना खाण्याच्या वस्तु न देणे. लोक खारींना खाद्य देऊन त्यांचा स्वभाव का बदलतात नकळे. एका  ठकाणी ('समीट लेक', लासन) अनुज्ञा नसतांना एका कुत्र्याला घेऊन देखिल एक प्राणी आला होता.









रेडवुड्स रुझवेल्ट एल्क्स करता प्रसिद्ध आहे. ते खुपच सहजासहजी पहायला मळाले. क्रेटर लेकला दोन कोल्हे दसले आि चक्क एक उंदीर. कॉटेजमध्ये आलेल्या या आगंतुकाला एका ग्लास मध्ये पकडुन बाहेर सोडावे लागले.





पक्ष्यांमध्ये रॉबीन (एक सुंदर जोडी पण त्यात होती), क्लाक्स नटक्रॅकस, स्टेलस जे, नटहॅच, गधाडे, बदके व अजुनही काही दसले. एक जंको एका चतुरचा चट्टामट्टा करतांनाही सापडला. लाकडावर रंग मळवुन मस्त लपलेला एक नाकतोडा व अनेक रंगीबेरंगी फुलपाखरे दसली.











लासन  कवा रेडवुड्समध्ये एकही साप  दसला नाही हे मला जाणवले होते. मी असे म्हणताच अनु म्हणाली, 'जयला  दसला होता मी बेरी तोडत असतांना.' (इतर राष्ट्रीय उद्यानांमधुन काही न्यायाची परवानगी नसते. रेडवुड्स मध्ये मात्र खाता येतील  ततक्या बेरीज तोडुन खायची मुभा असते.) 'हे असेच गवत होते'. मी  तकडे पाहीले आ  म्हंटले, 'तो पहा साप', कारण मला खरच  तथे एक सळसळत जाणारा साप  दसला. (अनु व जयला देखिल). फोटो मात्र काढता आला नाही.

न लाजता फोटो सेशन्स करु देणारा सरड्याने सुद्धा  दसत नाही म्हणता म्हणता दर्शन  दले. जयला रेडवुड्स मध्ये जवळजवळ कोणताही पदाथ खाऊ शकणारा असा 'बनाना स्लग' असतो तो पहायचा होता. रेडवुड सोडायची वेळ झाली तरी तो काही  दसेना. परततांना एका जागेकडे असेच बोट दाखवुन अनु म्हणाली, 'या  ठकाणी पाणी असते तर बनाना स्लग  दसला असता'. आ   लगेच जय  तकडे पाहुन म्हणाला, 'तो काय, आहे तर खरा'. ( कवा तसलेच काही आंग्ल भाषेत).



